# PROFIT ADVERTISERS (INDIA) Pvt. Ltd.

## PRESS CLIPPING

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Client | Agrovision [3rd Day] | | | | |
| Publication | Tarun Bharat | | | | |
| Language | Marathi | Place | Nagpur | Date | 14/11/16 |




मार्गदर्शन करताना नितीन गडकरी. व्यासपीठावर रमेश मानकर, डॉ. सी. डी. मायी व टीएसके रेड्डी

# बांबू पीक शेतकऱ्यांच्या जीवनात क्रांती घडवेल

- नितीन गडकरी यांचे प्रतिपादन
- ॲग्रो व्हिजनमध्ये कार्यशाळा

तभा वृत्तसेवा
नागपूर, १३ नोव्हेंबर

बांबूचा उपयोग आज अनेक क्षेत्रात होऊ लागला आहे. चीनमध्ये तर बांबूने प्रचंड प्रमाणात रोजगार उपलब्ध करून दिला आहे. बांबूचे पीक हमखास उत्पन्नाचे मोठे स्रोत आहे. बांबूचे पीक घेतल्यास विदर्भातील शेतकऱ्यांच्या जीवनात मोठी क्रांती होईल, असे ठाम प्रतिपादन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केले. रेशीमबाग येथे सुरू असलेल्या ॲग्रो व्हिजन राष्ट्रीय कृषी प्रदर्शनात आज रविवारी १३ नोव्हेंबरला बांबू उत्पादनावरील कार्यशाळेत ते बोलत होते.

### कायदा शिथिल करण्यासाठी प्रयत्न

बांबूचे पीक घ्यायला शेतकरी तयार आहेत. पण बांबू पूर्णपणे तयार झाल्यानंतर त्याची कापणी त्याला वनविभागाच्या परवानगीशिवाय करता येत नाही. ही मोठी अडचण आहे. हा कायदा शिथिल करण्यासाठी शासनाचे प्रयत्न सुरू आहेत. राज्याचे वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांना या संदर्भात संबंधितांशी चर्चा करून शेतातील बांबू कापण्याची परवानगी देण्याची सूचना केल्याची माहितीही गडकरी यांनी दिली. शेतकऱ्यांच्या शेतातील बांबू शासन खरेदी करेल, अशी ग्वाही देखील त्यांनी दिली.

बांबूचा वापर अनेक प्रकारे केला जाऊ शकतो. बांधकाम, फर्निचर, उदबत्त्या, ग्रीन पॉवर, कपडा आदींचा त्यात प्रामुख्याने समावेश करता येईल. याशिवाय पर्यावरणाचे संतुलनही राखण्यात बांबूचा फार मोठा भाग आहे. शेतकऱ्यांच्या जीवनातील नैराश्य दूर करण्यासाठी सुद्धा बांबू अत्यंत उपयुक्त आहे. शेताच्या धुऱ्यावर याचे पीक चांगल्या प्रकारे घेता येऊ शकते. बांबूला पाणी सुद्धा फार कमी लागते. धुऱ्यावर बांबूची लागवड केल्यास सोसाट्याच्या वाऱ्यापासून पिकांचे संरक्षण केले जाऊ शकते.

अतिवृष्टीच्या परिस्थितीत शेतातील माती वाहून जाण्याला देखील मोठ्या प्रमाणात अटकाव होऊ शकतो. त्यामुळे विदर्भातील शेतकऱ्यांनी त्यांच्या शेताच्या धुऱ्यावर बांबूचे पीक घेण्याची आज खरी गरज आहे, असेही गडकरी यांनी सांगितले.